सकाळ
कोल्हापूर, रविवार, २८ फेब्रुवारी २०१६

# ग्रंथदिंडीने आली रंगत

## झांजांच्या ठेक्यात प्रबोधनदिंडीही; पथनाट्यांनी वेधले लक्ष

कोल्हापूर, ता. २७ : 'ग्रंथ आमुचे साथी, ग्रंथ आमुच्या हाती', 'ऊर्जा वाचवा भविष्य सावरा', 'स्वच्छ जीवन, सुंदर जीवन', अशा घोषणा देत काढलेली ग्रंथदिंडी लक्षवेधी ठरली. झांजपथकाच्या तालाने व पथनाट्यांनी ग्रंथदिंडीची रंगत वाढवली. निमित्त होते, शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्याचे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे कमला महाविद्यालय येथे पालखी पूजनाने उद्‌घाटन झाले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ पदवीदान कार्यक्रमानिमित्त शनिवारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीला सुरवात झाली.

या वेळी महावीर महाविद्यालय व कॉमर्स कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार विषयावर पथनाट्य सादर केले. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी झांजपथकाचा ठेका सुरू केला. ग्रंथदिंडी हळूहळू जनता बझार मार्गावर आली. तेथून राजारामपुरीतून आईचा पुतळा, सायबर चौकाच्या दिशेने मार्गस्थ झाली. छत्रपती शिवाजी महाराज की जय, राजर्षी छत्रपती शाहू महाराज की जय, जय शिवाजी, जय भवानी, या घोषणा दिल्या. ऊर्जेचा ऱ्हास अन् पिढ्यान् पिढ्या त्रास, जल है तो कल है, आण्विक ऊर्जा देई

पान २ वर »

# ग्रंथदिंडीने आली रंगत

» पान १ वरून

विकासाला दर्जा, असे प्रबोधनाचे फलक विद्यार्थ्यांच्या हाती होते.

ग्रंथदिंडीत बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, सहायक ग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांच्यासह प्राचार्य डॉ. एच. एस. वनमोरे, प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, आर. पी. देठे, प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे, अनिल पाटील, शहाजी जगदाळे, स्नेहल डंबाळ, डॉ. रवींद्र आडाव, एस. बी. कोरडे, स्वाती तोरस्कर, प्रभाकर कदम, प्रा. ए. ए. घस्ते, ए. आर. पाटील, प्रा. अंकुश गोंडगे, व्ही. जी. कांबळे, डॉ. सी. पी. कुरणे, एस. एफ. बोथीकर, डॉ. अर्चना जगतकर, एच. पी. पाटील, आर. सी. पाटील, डॉ. गोपाळ गावडे, एस. के. महाजन सहभागी झाले होते.

कमला, महावीर, शहाजी, न्यू, गोखले, डेक्कन इन्स्टिट्यूट, सायबर, डी. डी. शिंदे सरकार, विवेकानंद, राजाराम, श्री व्यंकटेश्वरा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी ग्रंथदिंडीत सहभाग घेतला.




कोल्हापूर : ग्रंथदिंडीत प्रबोधनाचे फलक घेऊन सहभागी झालेल्या महाविद्यालयीन विद्यार्थिनी.